Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. ०९ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक २ । पाने २।

DIGITAL EDITION

मिशन बंगाल : अमित शाह यांचा १५ दिवसांचा 'तंबू'

(पान २ वर)



» Selected

## खरातच्या ताब्यासाठी शिर्डी पोलिसांचा न्यायालयात अर्ज



राहाता। भोंदू अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात व इतर तीन अशा ५ जणांविरुद्ध शिर्डीत शेतजमीन खरेदी व समता पतसंस्थेत बनावट खाते उघडणे, अशा दोन गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी मुख्य आरोपी खरात याचा ताबा मिळावा, यासाठी शिर्डी पोलिसांनी येथील कनिष्ठ न्यायालयात अर्ज दाखल केला आहे, तसेच खरात याची फरार असलेली पत्नी कल्पना खरात हिने वकिलामार्फत अटकपूर्व जामिनासाठी येथील सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. भूखंड खरेदीप्रकरणी जमीन व्यवहाराच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक व शिर्डी पोलीस येथे गुन्हा दाखल असून बावके व किरण सोनवणे या दोघांना न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## शेतकऱ्यांना दिलासा; मका हमीभाव खरेदीला मुदतवाढ



मुंबई । खरीप पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत किमान आधारभूत किंमत (एमएसपी) खरेदी योजनेंतर्गत पूर्व नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून मका खरेदीसाठी केंद्र सरकारने ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. ज्वारी, बाजरी, मका, रागी या भरडधान्य खरेदीची अंतिम मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर केंद्र शासनाने मका खरेदीसाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली होती.

## मुंबईच्या सीमेवर 11 हजार लिटर दूध जप्त

मुंबई : भेसळयुक्त दुधाचे वितरण थांबवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने मंगळवारी रात्री मुंबई आणि उपनगरातील टोल नाक्यांवर विशेष तपासणी मोहीम राबविली. मुलुंड, ऐरोली, मानखुर्द, दहिसर आणि शिवड या ठिकाणी तपासणी केली. या कारवाईत तब्बल ११ हजार ८० लिटर दूध साठा जप्त करण्यात आलामुंबई शहर व उपनगरात दुधाची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यासाठी मंगळवारी रात्री शहराच्या टोल नाक्यांवर विशेष तपासणी मोहीम अन्न व औषध प्रशासनाकडून हाती घेण्यात आली होती.

## एकनाथ शिंदेंनी डाव टाकला, अनेकांचा शिवसेनेत प्रवेश

# उद्धव ठाकरेंना जबर हादरा!

### पक्षातील अनेक कार्यकर्त्यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला

जन सम्राट टाईम्स

**मुंबई : राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, पक्षांतराचे सत्रही जोरात सुरू झाले आहे. अशातच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे. कोकण आणि विदर्भातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. या घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत.**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः सोशल मीडियावरून या पक्षप्रवेशाची माहिती देत उबाठा गटातील अनेक प्रमुख नेत्यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केल्याचे जाहीर केले.



#### विदर्भातूनही प्रतिसाद

केवळ कोकणच नव्हे तर विदर्भातही शिंदे गटाला चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. हिंगणा मतदारसंघातील गजेंद्र काकडे, राजेंद्र गिरडकर, नरेश देवगडे यांसारख्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचा झेंडा हाती घेतला. यामुळे आगामी निवडणुकांमध्ये विदर्भातही शिंदे गट अधिक प्रभावी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

चिपळूण येथील युवासेना विस्तारक उमेश खलाटे, उरणचे माजी नगरसेवक सुरेंद्र गौतम यांच्यासह अनेकांनी भगवा झेंडा हाती घेतला. कोकणातील चिपळूण, उरण आणि पनवेल परिसरातून मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने शिंदे गटाची ताकद वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. विजय शिर्के, ओंकार पंडित, दिप्ती सावंत देसाई, इकबाल बेबल, समीर कदम यांसारख्या जिल्हाप्रमुख विनोद साबळे, तसेच हिंगणा मतदारसंघातील अपक्ष स्थानिक पदाधिकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. उरण परिसरातून उपसरपंच अमर म्हात्रे, सुनंदा म्हात्रे, संकल्प घरत आणि इतर अनेक पदाधिकारी शिंदे गटात सामील झाले. तसेच पनवेलमधील महिला पदाधिकाऱ्यांनीही शिवसेनेत प्रवेश करत पक्षाची ताकद वाढवली.


#### उबाठा गटाला मोठा धक्का

या पक्षप्रवेशामुळे उद्धव ठाकरे यांच्या गटाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. विशेषतः कोकणातील पारंपरिक बालेकिल्ल्यातील कार्यकर्त्यांनी शिंदे गटाची वाट धरल्याने उबाठा गटाच्या संघटनात्मक ताकदीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पक्षप्रवेश सोहळ्याला उद्योग मंत्री उदय सामंत, मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार श्रीरंग बारणे, तसेच इतर अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. एकूणच, निवडणुकांच्या तोंडावर झालेल्या या मोठ्या पक्षप्रवेशामुळे राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे असून, पुढील काळात याचा थेट परिणाम निवडणुकांवर होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तीन राज्यात प्रचाराचा धुरळा थांबला!

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली : विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या मोठ्या टप्प्यासाठी तीन राज्यातील प्रचाराच्या तोफा मंगळवारी थंडावल्या आहेत. आसाम, केरळ आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरीमध्ये मंगळवारी सायंकाळी ६ वाजता प्रचाराची अधिकृत मुदत संपली. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, मतदानाच्या ४८ तास आधी जाहीर सभा, लाऊडस्पीकर आणि मोठ्या मिरवणुकांवर बंदी येत असल्याने, आता राजकीय पक्षांना केवळ 'डोअर-टू-डोअर' प्रचारावर भर द्यावा लागणार आहे. गेल्या काही दिवसांपासून या राज्यांमध्ये दिग्गज नेत्यांनी प्रचाराचा झंझावात निर्माण केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सभांचा धडाका लावला. आसाममध्ये सत्ता राखण्यासाठी भाजपने तर केरळमध्ये डाव्या लोकशाही आघाडीने (एलडीएफ) पुन्हा वर्चस्व मिळवण्यासाठी पूर्ण ताकद पणाला लावली आहे. मंगळवारी शेवटच्या दिवशी भव्य रोड शो आणि रॅलींच्या माध्यमातून



शेवटच्या मतदारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सर्वच पक्षांनी केला. या निवडणुकीत स्थानिक अस्मिता, बेरोजगारी आणि कल्याणकारी योजना हे मुद्दे केंद्रस्थानी राहिले आहेत.

आसाममधील १२६ जागांवर भाजप आणि काँग्रेस यांच्यात 'काँटे की टक्कर' पाहायला मिळत आहे, तर केरळच्या १४० जागांसाठी एलडीएफ आणि युडीएफ यांच्यात पारंपारिक चुरस आहे. पुद्दुचेरीतही ३० जागांसाठी राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रत्येक पक्षाने आपली 'गॅरंटी' समोर ठेवली आहे. प्रचार संपल्यानंतर आता सर्व उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद होण्यासाठी निवडणूक प्रशासन सज्ज झाले आहे. कडक सुरक्षा व्यवस्थेत मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून, या सर्व राज्यांचा निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहे.

## युद्धामुळे वस्त्रोद्योगाला फटका

जन सम्राट टाईम्स

कोल्हापूर : आशियात गेल्या महिनाभराहून अधिक काळ सुरू असलेले युद्ध तात्पुरते थांबले असले तरी यामुळे वस्त्रोद्योगाची आर्थिक घडी पूर्ण विस्कटली आहे. कापूस, सुतासह अन्य कच्च्या मालामध्ये २५ ते ४० टक्क्यांहून जास्त दरवाढ झाली आहे. वाढता उत्पादन खर्च, थंडावलेली मागणी आणि ठप्प झालेली निर्यात यामुळे उद्योग पूर्णपणे अडचणीत आला आहे. यातून गेल्या महिन्याभरात राज्यातील वस्त्रोद्योगाचे तीन हजार कोटींहून अधिक रुपयांचे नुकसान झाल्याचे वस्त्रोद्योग महासंघाच्या आढाव्यातून पुढे आले आहे. हा वाढता तोटा नियंत्रित करण्यासाठी अनेक उद्योगांनी एका पाळीतील काम बंद किंवा आठवड्यातील दोन दिवस काम बंदचे पर्याय निवडले आहेत. तसेच युद्ध थांबल्यानंतरही पूर्ववत स्थिती येण्यास मोठा काळ लागणार असल्याने हे नुकसान आणखी वाढणार आहे. कच्च्या तेलापासून तयार होणार्या मानवनिर्मित धाग्याच्या किमतीमध्ये २५ ते ४० टक्के वाढ झाली आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी गेले अनेक महिन्यांपासून कापसाच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढ – घट होत नव्हती. परिणामी कापड उत्पादन खर्चात लक्षणीय बदल जाणवत नव्हता.२९ मिमी प्रकारच्या कापसाचे दर महिन्याभरात प्रतिखंडी ५४ हजार रुपयांवरून ६१ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. तर, ५ किलो सुताचा १२६० रुपये इतका असणारा दर आता १४१५ रुपयांपर्यंत वाढला आहे. शिवाय, कापसाची मागणीही घटली आहे. कच्च्या मालामध्ये दरवाढीचा आलेख उंचावत असताना पक्क्या मालाच्या दरामध्ये फारशी वाढ झालेली नाही. पॉपलिनसारख्या कापड प्रकारात प्रति मीटर एक रुपये इतकी अत्यल्प वाढ झाली आहे. या संकटामुळे सूतगिरण्यांना सरासरी दोन ते तीन दिवस उत्पादन बंद ठेवावे लागत आहे. नव्याने कापड मागणीचे प्रमाण अत्यल्प असून निर्यात मंदावली आहे. या सर्वांचा देशातील विविध संघटनांनी घेतलेल्या आढाव्यानंतर वस्त्रोद्योगाचे सुमारे चार हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची भीती वस्त्रोद्योजक आणि वस्त्रोद्योग संघटनेचे पदाधिकारी किरण तारळेकर यांनी व्यक्त केली.

## 'पुढील ४८ तास आहे, तिथेच थांबा!

### इराणमधील भारतीयांना केंद्राचा मोठा इशारा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली:** विशेष प्रतिनिधी मध्यपूर्वेतील इराण आणि इस्रायल यांच्यात वाढता तणाव पाहता, केंद्र सरकारने इराणमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची 'ट्रॅव्हल ॲडव्हायझरी' (मार्गदर्शक सूचना) जारी केली आहे. "पुढील ४८ तास तुम्ही जिथे आहात, तिथेच सुरक्षित राहा आणि अनावश्यक प्रवास टाळा," असे स्पष्ट आदेश सरकारने दिले आहेत. इराण आणि इस्रायलमधील युद्धासारखी परिस्थिती आणि वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीयांच्या सुरक्षेचा




प्रश्न निर्माण झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून केंद्र सरकारने ही तातडीची सूचना दिली आहे. पुढील दोन दिवस अत्यंत संवेदनशील असल्याचे मानले जात असून, या काळात भारतीयांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दूतावासाच्या संपर्कात राहा: तेहरानमधील भारतीय दूतावासाने सर्व भारतीयांना नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्याशी संपर्क साधणे सोपे होईल.

#### इराणमधील भारतीय सुरक्षित आहेत का?

मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय दूतावास सातत्याने स्थानिक परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. इराणमध्ये शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायानिमित्त हजारो भारतीय वास्तव्यास आहेत. केंद्र सरकारने यापूर्वीच भारतीयांना इराण किंवा इस्रायलचा प्रवास न करण्याचा सल्ला दिला होता. आता जे आधीच तिथे आहेत, त्यांच्या सुरक्षेसाठी हे कडक पाऊल उचलण्यात आले आहे. हेल्पलाईन क्रमांक आणि मदत भारतीय दूतावासाने आपत्कालीन परिस्थितीसाठी हेल्पलाईन क्रमांक जारी केले आहेत. "आम्ही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी सर्व आवश्यक पावले उचलली जात आहेत," असे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी सांगितले आहे. नागरिकांना आवाहन: इराणमध्ये राहणाऱ्या तुमच्या नातेवाईकांना किंवा ओळखीच्या व्यक्तींना या बातमीद्वारे सतर्क करा आणि त्यांना दूतावासाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करायला सांगा.

## गुजरातचा दिल्लीवर थरारक विजय

### गुजरातने यंदाच्या हंगामातील पहिला विजय नोंदवला

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली:** दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातील अटीतटीच्या सामन्यात गुजरातने अखेरच्या चेंडूवर बाजी मारली आहे. गुजरातने दिल्लीचा घरच्या मैदानावर फक्त एका धावेने पराभव केला. दिल्लीकडून केएल राहुलने ९२ धावांची खेळी केली, तर डेव्हिड मिलरने २० चेंडूत ४१ धावा केल्या, पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. तर गुजरातकडून रशीद खानच्या ३ विकेट्स महत्त्वपूर्ण ठरल्या. यासह गुजरात टायटन्सने यंदाच्या हंगामातील पहिला विजय नोंदवला आहे. दिल्लीला अखेरच्या षटकांमध्ये १२ चेंडूत ३६ धावांची गरज होती. १९वं षटक टाकण्यासाठी मोहम्मद सिराज आला. मिलरने या षटकात दोन षटकार व एक चौकार लगावला. तर विप्रज निगमने एक चौकार लगावला आणि या षटकात २३ धावा कुटल्या. यासह दिल्ली



कॅपिटल्सला विजयासाठी अखेरच्या षटकांत १३ धावांची गरज होती. विप्रज निगम स्ट्राईकवर होता, तर प्रसिध कृष्णा गोलंदाजी करत होता आणि त्याने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला. पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळताना विप्रज झेलबाद झाला आणि नंतर आलेल्या कुलदीपने लगेचच एक धाव घेत मिलरला स्ट्राईक दिली. विजयासाठी ३ चेंडूत ८ धावांची गरज होती. यानंतर तिसऱ्या चेंडूवर मिलरने दणदणीत षटकार लगावला. २ चेंडूत २ धावांची गरज असताना पाचव्या चेंडूवर मिलर व कुलदीपने एकही धाव घेतली नाही, ज्यामुळे दिल्लीवरचा दबाव वाढला आणि अखेरचा चेंडू निर्णायक ठरला.




जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## राजकारणाची पातळी घसरली!

### "पवन खेडांना 'पवन येडा' बनवूनच सोडेन" ; आसामच्या मुख्यमंत्र्यांची जीभ घसरली

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली :** देशातील राजकीय वातावरणात सध्या आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींनी सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्याचे चित्र दिसत आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पवन खेडा यांच्यातील संघर्ष आता टोकाला पोहोचला आहे. आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या पत्नीवर झालेल्या वैयक्तिक आरोपांनंतर या वादाला कायदेशीर वळण लागले आहे. मुख्यमंत्री शर्मा यांच्या पत्नीने केलेल्या तक्रारीनंतर आसाम पोलीस खेडा यांना अटक



करण्यासाठी राजधानी दिल्लीत दाखल झाले आहेत. पवन खेडा यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा यांचा संयम सुटल्याचे पाहायला मिळाले. एका जाहीर सभेत बोलताना ते म्हणाले, "पवन खेडा यांच्यासारख्या लोकांमुळे काँग्रेसची पातळी खालावली आहे. मी त्यांना 'पवन येडा' बनवूनच सोडेन. राहुल गांधींपासून पवन खेडांपर्यंत वरून खाली सर्वच काँग्रेसवाल्यांना वेड लागले आहे." मुख्यमंत्र्यांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, भाषेच्या घसरलेल्या पातळीवर चर्चा सुरू झाली आहे. या वादाची ठिणगी पवन खेडा यांनी मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा यांच्या पत्नीवर केलेल्या एका खळबळजनक आरोपामुळे पडली. खेडा यांनी दावा केला होता की, मुख्यमंत्र्यांच्या पत्नीकडे तीन वेगवेगळे पासपोर्ट आहेत.

#### राजकारणाची घसरलेली पातळी: चिंतेचा विषय

केवळ शाब्दिक युद्ध न थांबता आता हे प्रकरण अटकेपर्यंत पोहोचले आहे. दाखल झालेल्या तक्रारीची दखल घेत आसाम पोलिसांचे एक विशेष पथक पवन खेडा यांना ताब्यात घेण्यासाठी नवी दिल्लीत पोहोचले आहे. यामुळे राजधानीत राजकीय हालचालींना वेग आला असून, काँग्रेसने या कारवाईला 'लोकशाहीची हत्या' आणि 'सूडाचे राजकारण' असे संबोधले आहे. एकीकडे विकास आणि धोरणांवर चर्चा होणे अपेक्षित असताना, दुसरीकडे वैयक्तिक उणीदुणी काढणे, कुटुंबावर टीका करणे आणि 'वेडा', 'कुत्रा' यांसारख्या शब्दांचा वापर करणे यामुळे भारतीय राजकारणाची प्रतिमा मलिन होत असल्याचा सूर सुज्ञ नागरिकांमधून उमटत आहे.

# आंबेडकरी चळवळीची सद्यस्थिती आणि आगामी वाटचालीचे भवितव्य !




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या चळवळीची मुहूर्तमेढ रोवली, ती केवळ एका जातीची किंवा एका धर्माची मुक्तिलढाई नव्हती - ती भारतीय लोकशाहीच्या पुनर्निर्मितीची, मानवी प्रतिष्ठेच्या पुनःस्थापनेची, आणि वैज्ञानिक विवेकवादाच्या प्रसाराची व्यापक सामाजिक क्रांती होती. महाड सत्याग्रह (१९२७), मनुस्मृती दहन (१९२७), नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०), येवल्याची घोषणा (१९३५), धर्मांतर (१९५६) — या प्रत्येक घटनेतून एक अभूतपूर्व वैचारिक धारा प्रवाहित झाली. या धारेने शतकानुशतके दडपलेल्या कोट्यवधी माणसांना आत्मसन्मानाची भाषा दिली, न्यायाचे शस्त्र दिले, आणि संविधानाचे कवच दिले. परंतु आज, बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर सात दशकांहून अधिक काळ उलटल्यावर, त्याच चळवळीची स्थिती काय आहे? ती अधिक बळकट झाली आहे, की विखुरली आहे? तिचे ध्येय अधिक स्पष्ट झाले आहे, की धुक्यात हरवले आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आजच्या काळात अत्यंत आवश्यक आहे.

## चळवळीची वाटचाल - कालातीत संघर्षाची नोंद

**१ उभारणीचा काळ (१९२०–१९५६)** बाबासाहेबांच्या नेतृत्वाखालील हा काळ म्हणजे चळवळीचा सुवर्णकाळ होता. या काळात चळवळीने केवळ प्रतीकात्मक लढाया लढल्या नाहीत, तर संस्थात्मक उभारणी केली. "बहिष्कृत हितकारिणी सभा" (१९२४), "समता सैनिक दल", "शेड्युल्ड कास्ट फेडरेशन", आणि अखेरीस "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया"ची संकल्पना - या सर्वांमधून एक सुसंघटित राजकीय-सामाजिक शक्ती उभी राहिली. या काळातील चळवळ विचार, संघटना, आणि कृती या तिन्ही आघाड्यांवर एकाच वेळी लढत होती.

**२ विभाजनाचा काळ (१९५७–१९८०)** बाबासाहेबांच्या निधनानंतर चळवळीचे राजकीय नेतृत्व अनेक गटांमध्ये विभागले गेले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आरपीआय) असंख्य उपगट तयार झाले. दादासाहेब गायकवाड, बी. सी. कांबळे, आर. डी. भंडारे, एन. शिवराज - प्रत्येकाने आपापले स्वतंत्र राजकीय मार्ग चोखाळले. या विभाजनामुळे चळवळीच्या राजकीय ताकदीला मोठा धक्का बसला, कारण निवडणुकांमध्ये मते एकत्रित होण्याऐवजी विखुरली जाऊ लागली.

**३ पुनरुज्जीवनाचा काळ (१९८०–२०००)** या काळातील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे कांशीराम यांनी उत्तर भारतात उभारलेली बहुजन समाज पार्टी (बसपा). त्यांनी "जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेदारी" हे सूत्र देत दलित-ओबीसी-अल्पसंख्याक महाआघाडीचे स्वप्न पाहिले. उत्तर प्रदेशात मायावती यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्रिपद चार वेळा मिळवणे हे एक ऐतिहासिक यश होते. याच काळात महाराष्ट्रात नामदेव ढसाळ, दया पवार, नागार्जुन, वामनदादा कर्डक यांच्यासारख्या साहित्यिकांनी दलित साहित्याचे नवे आयाम स्थापित केले.

**४ डिजिटल आणि जागतिकीकरणाचा काळ (२०००–आजपर्यंत)** या टप्प्यात आंबेडकरी विचार जागतिक स्तरावर पोहोचला. परदेशातील भारतीय दलित डायस्पोरा सक्रिय झाला. युनायटेड नेशन्समध्ये जाती-आधारित भेदभावाची नोंद होऊ लागली. रोहित वेमुला प्रकरण (२०१६), ऊना घटना (२०१६), आणि भीमा कोरेगाव उठाव (२०१८) यांनी चळवळीत नवा ऊर्जास्त्रोत निर्माण केला. सोशल मीडियावर आंबेडकरी विचारांचा प्रसार अभूतपूर्व वेगाने झाला.

## सद्यस्थितीचे वास्तवदर्शी चित्र

**१ शैक्षणिक उन्नती :** आरक्षण धोरणामुळे दलित समाजातील शिक्षणाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. आयआयटी, आयआयएम, एम्स यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये दलित विद्यार्थी पोहोचले आहेत. डॉक्टर, इंजिनीअर, वकील, प्राध्यापक, आयएएस-आयपीएसअधिकारी - या क्षेत्रांत दलित प्रतिनिधित्व वाढले आहे.

**२ राजकीय उपस्थिती :** राष्ट्रपतिपदापासून (के. आर. नारायणन, रामनाथ कोविंद) ते ग्रामपंचायत सदस्यापर्यंत दलित राजकीय प्रतिनिधित्व संविधानाच्या चौकटीत सुनिश्चित झाले आहे. अनेक राज्यांत दलित मुख्यमंत्री झाले आहेत.

**३वैचारिक जागरण :** बाबासाहेबांचे विचार आता केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. देशभरात, आणि जगभरात त्यांचे विचार अभ्यासले जातात. विद्यापीठांमध्ये अंबेडकर अध्यासने स्थापन झाली आहेत. त्यांच्या ग्रंथांचे अनेक भाषांत अनुवाद झाले आहेत.

**४सांस्कृतिक अभिव्यक्ती :** दलित साहित्य, दलित कला, दलित चित्रपट, दलित संगीत - या सर्वांनी मुख्य प्रवाहात स्थान मिळवले आहे. जय भीम, रिपोर्टर, कोर्ट यांसारख्या चित्रपटांनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवली आहे.

## आव्हाने : जे अजून सुटलेले नाही

**१. राजकीय विखंडन — सर्वांत मोठी शोकांतिका**

आंबेडकरी चळवळीसमोरील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे तिचे राजकीय विखंडन. एकट्या महाराष्ट्रात आरपीआय चे डझनभर गट आहेत. रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, जोगेंद्र कवाडे, आनंदराज आंबेडकर - प्रत्येक नेता वेगळ्या दिशेने चालतो आहे. या विखंडनामुळे ८५+ टक्के बहुजन मतशक्ती प्रत्यक्षात केवळ ३-४ टक्के राजकीय परिणाम देत आहे. उत्तर प्रदेशात बसपची घसरण हे याचे ज्वलंत उदाहरण आहे. एकेकाळी ४०३ पैकी २०६ जागा जिंकणारी बसप आता एकल-अंकी जागांवर घसरली आहे. नेतृत्व-संक्रमण, संघटनात्मक शिथिलता, आणि कार्यकर्त्यांमधील निराशा — या सर्वांमुळे हे घडले आहे.

**२. सामाजिक अत्याचाराचे सातत्य**

संविधान आणि कायद्याने अस्पृश्यता नष्ट केली असली, तरी व्यवहारात ती अनेक रूपांत जिवंत आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग (एनसीआरबी) च्या आकडेवारीनुसार दलितांवरील अत्याचाराचे प्रकरण दरवर्षी ५०,००० पेक्षा जास्त नोंदवले जातात. हाथरस, उना, खैरलांजी, भीमा कोरेगाव - ही नावे केवळ घटना नाहीत, तर संवैधानिक मूल्यांच्या अपयशाची साक्ष आहेत. ग्रामीण महाराष्ट्रात, विशेषतः मराठवाड्यात आणि विदर्भात, आजही दलित वस्त्यांना स्वतंत्र पाण्याचे नळ, स्मशानभूमीसाठी संघर्ष, मंदिरप्रवेशावर अप्रत्यक्ष बंधने - या गोष्टी अस्तित्वात आहेत.

**३. आर्थिक विषमतेची दरी**

आरक्षणाचे फायदे प्रामुख्याने शहरी, उच्चशिक्षित दलित कुटुंबांपर्यंत पोहोचले. ग्रामीण आणि गरीब दलित समाज अजूनही भूमिहीन शेतमजुरी, गटार सफाई, आणि मैला वाहण्याच्या दुष्टचक्रात अडकलेला आहे. ऑक्सफॅम इंडियाच्या अहवालानुसार, दलित आणि उच्चवर्णीय यांच्यातील संपत्तीची दरी गेल्या तीस वर्षांत वाढली आहे, कमी झालेली नाही.



**"करंट इश्यू"**

**विशाखा कनोजिया**
आंबेडकरी स्टुडंट्स चळवळ, एसएसपीयु, पुणे.

**४. वैचारिक सौम्यीकरण आणि प्रतीकवाद**

बाबासाहेबांचे विचार आज अनेकदा त्यांच्या खोलीपासून वेगळे केले जातात. त्यांचे पुतळे उभारणे, जयंती साजरी करणे, आणि त्यांच्या नावाने योजना राबवणे - एवढ्यापुरतीच अनेकदा "आंबेडकरी भावना" मर्यादित राहते. बाबासाहेबांच्या "ॲनहिलेशन ऑफ कास्ट" या मूलभूत ग्रंथाची मागणी करणे, त्यातील विचारांवर आचरण करणे — हे अनेकदा विस्मरणात गेले आहे. याशिवाय, काही राजकीय पक्षांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेचा सोयीनुसार वापर केला आहे, पण त्यांच्या विचारांशी बांधिलकी नाही. "आंबेडकरवाद" हा शब्द आता इतका ताणला गेला आहे की, तो अनेकदा रिकाम्या प्रतीकवादापुरता उरला आहे.

**५. आंतर-दलित भेद आणि जातीयवाद**

दलित समाजांतर्गत उपजातींमधील भेद हा एक संवेदनशील पण गंभीर मुद्दा आहे. महार, चांभार, मांग, भंगी, वाल्मीकी — या उपजातींमध्ये आरक्षणाच्या वाटपावरून, राजकीय नेतृत्वावरून संघर्ष होतात. या आंतर-जातीय विभाजनामुळे एकत्रित राजकीय-सामाजिक शक्ती उभी करणे कठीण होते.

**६. तरुण पिढीसमोरील अस्मिता-संकट**

आजची शिक्षित दलित तरुण पिढी एका विचित्र द्विधावस्थेत आहे. एकीकडे त्यांना नवउदारवादी बाजारपेठ "व्यक्तिगत यश" देत आहे, तर दुसरीकडे जातीय भेदभाव त्यांना त्यांची "सामाजिक ओळख" सतत आठवण करून देतो. विद्यापीठात रोहित वेमुलाने जे अनुभवले, ते लाखो दलित विद्यार्थ्यांचे दैनंदिन वास्तव आहे. या पिढीला चळवळीत ओढण्यासाठी नवी भाषा, नवे माध्यमे, आणि नवे नेतृत्व आवश्यक आहे.

आव्हानांचे वर्गीकरण - एक विश्लेषण

टेबल (इमेज दिली आहे)

**भवितव्याचे मार्ग - आगामी वाटचाल कशी असावी?**

वैचारिक पुनर्जागरण - मुळांकडे परत

आंबेडकरी चळवळीचे भवितव्य प्रथमतः वैचारिक बळावर अवलंबून आहे. बाबासाहेबांचे संपूर्ण साहित्य - "ॲनहिलेशन ऑफ कास्ट", "क्षुद्र कोण होय?", "बुद्ध आणि त्याचा धम्म", "रिडल्स", "पाकिस्तान ऑर पार्टिशन ऑफ इंडिया" - हे केवळ "आंबेडकरी" लोकांसाठी नाही, तर संपूर्ण भारतीय समाजासाठी वाचनीय आहे.विद्यापीठ स्तरावर, शाळा स्तरावर, आणि सामाजिक संस्था स्तरावर बाबासाहेबांच्या विचारांचे अध्ययन-मंडळे निर्माण झाली पाहिजेत. "वाचाल तर वाचाल" हे बाबासाहेबांचे उदगार आजही तितकेच प्रासंगिक आहेत.

राजकीय एकत्रीकरण - फुटीर गट नको, महाआघाडी हवी

प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने एक प्रयत्न केला, पण तो अपूर्ण राहिला. खऱ्या अर्थाने दलित-आदिवासी-ओबीसी-मुस्लिम असा बहुजन महाआघाडीचा प्रयोग झाला, तर महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरात राजकीय समीकरणे बदलू शकतात. यासाठी व्यक्तिगत अहंकार बाजूला ठेवणे आणि सामाजिक ध्येयाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. "सत्तेशिवाय सामाजिक न्याय नाही" हे बाबासाहेबांचे वास्तववादी राजकारण होते. त्यांनी म्हटले होते - "राजकीय शक्ती ही 'मास्टर-की' आहे, जी सर्व दरवाजे उघडते." या तत्त्वाचे विस्मरण होऊन चालणार नाही.

**आर्थिक स्वायत्तता - ' शिक्षण, संघटन, संघर्ष' पुरेसे नाही; आता 'अर्थकारण' हवे**

बाबासाहेबांनी "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" हा त्रिसूत्री मंत्र दिला. आजच्या काळात यात "आर्थिक स्वायत्तता मिळवा" ही चौथी बाजू जोडणे आवश्यक आहे. दलित उद्योजकता, दलित सहकारी बँका, दलित शेतकरी सहकारी संस्था, दलित-स्वामित्वाच्या कंपन्या - यांचे जाळे उभे करणे आवश्यक आहे. दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (डिक्की) या संस्थेने या दिशेने पाऊल टाकले आहे. पण हे प्रयत्न अधिक व्यापक आणि तळागाळापर्यंत पोहोचणारे हवेत.

डिजिटल चळवळ - सोशल मीडियाचे शस्त्र

युट्यूब, ट्विटर (एक्स), इन्स्टाग्राम, आणि व्हॉट्सॲप वर आंबेडकरी विचारांचा प्रसार झपाट्याने होत आहे. पण याचा वापर अधिक सुसंघटित, तथ्यनिष्ठ, आणि रचनात्मक असणे आवश्यक आहे. बाबासाहेबांविषयी खोट्या माहितीचा प्रतिवाद, संविधानाविषयी जागरण, आणि अत्याचाराच्या प्रकरणांना आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणे - हे डिजिटल माध्यमाने शक्य आहे. "दलित डेस्क", "राऊंड टेबल इंडिया", "आंबेडकर एज" यांसारख्या डिजिटल व्यासपीठांनी हे काम सुरू केले आहे. त्यांना अधिक संसाधने आणि प्रेक्षक मिळणे आवश्यक आहे.

**स्त्रीवादी दृष्टिकोन - दलित महिलांचे नेतृत्व**

दलित महिला या दुहेरी दडपणाखाली असतात - जात आणि लिंग या दोन्ही कारणांसाठी. बाबासाहेबांनी स्वतः महिला सशक्तीकरणाला अत्यंत महत्त्व दिले होते. आजच्या चळवळीत दलित महिला नेतृत्वाला केंद्रस्थानी ठेवणे ही केवळ नैतिक गरज नाही, तर रणनीतिक आवश्यकताही आहे. शिक्षण-क्षेत्रातील लढाई - कॅम्पसपासून ते कॅबिनेटपर्यंत रोहित वेमुला संस्थागत हत्या प्रकरणाने हे स्पष्ट केले की, उच्चशिक्षण संस्थांमध्ये जाती-भेदभाव किती खोलवर रुजलेला आहे. विद्यापीठांमध्ये आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशन सारख्या संघटनांना बळकट करणे, दलित-आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य सेवा, आणि फेलोशिप-स्कॉलरशिपसाठी संघर्ष - हे कॅम्पस स्तरावरील लढे आवश्यक आहेत.

**महाराष्ट्राचे विशेष दायित्व**

महाराष्ट्र हे आंबेडकरी चळवळीचे उगमस्थान आहे. नाशिक, पुणे, मुंबई, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) - ही शहरे चळवळीच्या ऐतिहासिक स्मृतींनी भरलेली आहेत. काळाराम मंदिर सत्याग्रहाची भूमी असलेल्या नाशिकचे आंबेडकरी वारसा जपण्याचे आणि पुढे नेण्याचे विशेष दायित्व आहे. महाराष्ट्रातील फुले-शाहू-आंबेडकर परंपरा ही जगातील सर्वांत समृद्ध सामाजिक सुधारणा परंपरांपैकी एक आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी रुजवलेले, राजर्षी शाहू महाराजांनी पोसलेले, आणि बाबासाहेबांनी घटनात्मक-संस्थात्मक आकार दिलेले हे वैचारिक वृक्ष आजही टिकवणे ही महाराष्ट्राची जबाबदारी आहे.

**चळवळ संपत नाही, ती रूपांतरित होते!**

बाबासाहेबांनी एकदा म्हटले होते — लाईफ शुड बी ग्रेट, रादर दॅन लाँग." (आयुष्य दीर्घ नव्हे, तर महान असावे.) हे केवळ व्यक्तीसाठी नव्हे, तर चळवळींसाठीही खरे आहे. आंबेडकरी चळवळीने काही ठिकाणी राजकीय प्रासंगिकता गमावली असेल, काही ठिकाणी संघटनात्मक बळ कमी झाले असेल - पण तिचा नैतिक आत्मा अजूनही जिवंत आहे. रोहित वेमुलाच्या शेवटच्या पत्रात, ऊनाच्या दलित युवकांच्या प्रतिकारात, भीमा कोरेगावला जमणाऱ्या लाखो लोकांच्या डोळ्यांत, आणि संविधानाच्या प्रती हातात घेऊन रस्त्यावर उतरणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये - या चळवळीचा ज्वाला दिसतो. आव्हाने मोठी आहेत, हे नक्की. पण बाबासाहेबांनी ज्या परिस्थितीत लढले, त्यापुढे आजची आव्हाने कमी दुर्धर आहेत. फरक एवढाच आहे की त्या वेळी बाबासाहेबांसारखे एकट्या नेत्याचे नेतृत्व होते - आज आपल्याला सामूहिक नेतृत्व उभे करावे लागेल.

"प्रबुद्ध भारत" हे बाबासाहेबांचे स्वप्न होते — जातीमुक्त, भेदभावमुक्त, विज्ञाननिष्ठ, आणि लोकशाहीवादी भारत. ते स्वप्न अधुरे आहे. ते पूर्ण करणे ही आपल्या पिढीची ऐतिहासिक जबाबदारी आहे.

जय भीम। जय संविधान।

---

# मिशन बंगाल : अमित शाह यांचा १५ दिवसांचा 'तंबू' आणि १७० पारचे लक्ष्य!

जन सम्राट टाईम्स



कोलकाता : पश्चिम बंगालच्या सत्तेवर भाजपचा झेंडा फडकावण्यासाठी निवडणूक चाणक्य अमित शाह यांनी कंबर कसली आहे. यावेळी केवळ रॅली करून न थांबता, त्यांनी थेट १५ दिवस बंगालमध्ये मुक्काम ठोकण्याचा निर्णय घेतला. शाह यांच्या या १५ दिवसांच्या मुक्कामाची अनेक कारणे आहेत. त्यात प्रामुख्याने हरलेल्या जागांवर फोकस, ममता दीदींच्या बालेकिल्ल्यात त्यांना आव्हान देणे, थेट बैठका-चर्चा या रणनीतीचा समावेश आहे. दुसरीकडे, पश्चिम बंगालमध्ये निवडणुकांच्या तोंडावर 91 लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याने राजकीय वाद पेटला आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पाठी एकदिलाने उभ्या राहणाऱ्या आणि तब्बल ८७ विधानसभा जागा असलेल्या सीमावर्ती चार जिल्ह्यातून २१ लाख नावे वगळण्यात आली आहेत. यात बहुसंख्य मुस्लिम मतदार आहेत. हा फटका कुणाला बसणार, यावरच बंगाल निवडणुकीचे भवितव्य ठरणार आहे.

*** हरलेल्या जागांवर फोकस:**

२०२१ च्या निवडणुकीत ४० हून अधिक जागा अशा होत्या जिथे भाजपचा ५ टक्क्यांहून कमी फरकाने पराभव झाला होता. शाह स्वतः या जागांवर जाऊन कार्यकर्त्यांना बळ देणार आहेत. भवानीपूर आणि नंदीग्राम यांसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांतून भाजपचे उमेदवार सुवेंदु अधिकारी यांच्या प्रचाराची धुरा त्यांनी स्वतःच्या हाती घेतली आहे. आणि दिवसा रॅली असा त्यांचा झंझावात असून, उत्तर बंगालपासून दक्षिण बंगालपर्यंत भाजपची पकड घट्ट करण्याचा त्यांचा मानस आहे. शाह यांचा हा मुक्काम म्हणजे केवळ प्रचार नसून, तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) किल्ल्याला भगदाड पाडण्यासाठी रचलेली एक सूक्ष्म रणनीती मानली जात आहे.

**९१ लाख मतांचा 'सर्जिकल स्ट्राईक': कोणाचे गणित बिघडणार?**

निवडणूक आयोगाने राबवलेल्या 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एसआयआर) प्रक्रियेत पश्चिम बंगालमधील मतदार यादीतून तब्बल ९० लाख ८३ हजार मतदारांची नावे वगळली आहेत. ही नावे मृत, स्थलांतरित किंवा दुबार मतदार या कारणास्तव काढली गेली असली, तरी यावरून राज्यात मोठा राजकीय वाद पेटला आहे. भाजपसाठी हे 'क्लीनअप' असून, घुसखोर आणि बनावट मतदारांची नावे गेल्याने विशेषतः सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये जिथे भाजपला कमी फरकाने फटका बसला होता, तिथे या बदलाचा भाजपला फायदा होऊ शकतो.

* ममता बॅनर्जींचा आरोप: मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यावर तीव्र आक्षेप घेत आरोप केला आहे की, "विशिष्ट समुदायांच्या" मतदारांना लक्ष्य करून त्यांची नावे यादीतून जाणीवपूर्वक हटवण्यात आली आहेत. मुर्शिदाबाद, मालदा आणि उत्तर २४ परगणा यांसारख्या मुस्लिम बहुल जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नावे कापली गेली असल्याने टीएमसीच्या हक्काच्या व्होट बँकेला हा मोठा धक्का मानला जात आहे.

**सत्तेचा पेच: निर्णायक**

वळणावर बंगाल ९१ लाख मते वगळली गेल्यामुळे बंगालमधील अनेक मतदारसंघांतील 'विनिंग मार्जिन' पूर्णपणे बदलले आहे. एका बाजूला अमित शाह यांची आक्रमक व्यूहरचना आणि दुसऱ्या बाजूला ममता बॅनर्जी यांची 'भावनिक आणि अस्मितेची' हाक, अशा कात्रीत बंगालचा मतदार अडकला आहे. ही ९१ लाख मते नक्की कोणाच्या पथ्यावर पडणार आणि अमित शाह यांचा १५ दिवसांचा मुक्काम सत्तेत बदल घडवणार का, याचे उत्तर ४ मे २०२६ रोजी होणाऱ्या मतमोजणीतच मिळेल.

---

# उत्तर प्रदेशात 'आंबेडकर मूर्ती विकास योजना' जाहीर; ४०३ कोटींचा निधी आणि उत्सवाची तयारी

## आंबेडकरच नव्हे, तर अन्य समाजसुधारकांचाही सन्मान

जन सम्राट टाईम्स

लखनौ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी १३५ व्या जयंतीनिमित्त उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारने एका मोठ्या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली आहे. राज्यातील आंबेडकरी स्मारके आणि पुतळ्यांचा कायापालट करण्यासाठी सरकारने 'डॉ. बी. आर. आंबेडकर मूर्ती विकास योजना' जाहीर केली आहे. त्यासाठी तब्बल ४०३ कोटी रुपयांच्या भरीव निधीला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे केवळ पुतळ्यांचे संरक्षणच होणार नाही, तर परिसराचे सुशोभीकरण करून एक नवे सांस्कृतिक वातावरण निर्माण केले जाणार आहे. या योजनेअंतर्गत उत्तर प्रदेशातील सर्व ४०३ विधानसभा मतदारसंघांमध्ये विकासकामे केली जातील. प्रत्येक मतदारसंघासाठी १ कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला असून, एका पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी कमाल १० लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत स्थापित झालेल्या पुतळ्यांचा यात समावेश करण्यात आला आहे. योगी सरकारने पुतळ्यांच्या देखभालीसाठी आणि सुरक्षेसाठी काही महत्त्वाचे निकष ठरवले आहेत: * संरक्षक छत्री (कॅनोपि): अनेक ठिकाणी पुतळे उघड्यावर असल्याने ऊन, वारा आणि पावसाचा त्यावर परिणाम होतो. आता सर्व प्रमुख पुतळ्यांवर कलाकुसर केलेली 'संरक्षक छत्री' (छत्र) उभारली जाईल. * संरक्षक भिंत आणि सुरक्षा: पुतळ्यांची विटंबना किंवा नुकसान होऊ नये, यासाठी मजबूत संरक्षक भिंती बांधल्या जातील. * सुशोभीकरण आणि उद्याने: पुतळ्याच्या सभोवतालचा परिसर केवळ मोकळी जागा न राहता तिथे हिरवळ, लहान उद्याने आणि बसण्यासाठी बाकांची व्यवस्था केली जाईल. * प्रकाशयोजना: रात्रीच्या वेळी हे परिसर उजळून निघण्यासाठी आधुनिक विद्युत



रोषणाई केली जाणार आहे. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरच नव्हे, तर संत रविदास, कबीर दास, महात्मा जोतिराव फुले आणि महर्षी वाल्मिकी यांच्या सार्वजनिक ठिकाणच्या पुतळ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. सामाजिक न्यायाचा विचार मांडणाऱ्या सर्व महापुरुषांचा सन्मान राखणे हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. आगामी १४ एप्रिल रोजी आंबेडकर जयंती अत्यंत भव्य स्वरूपात साजरी करण्याचे आदेश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले आहेत. * १३ एप्रिल: राज्यातील सर्व आंबेडकर उद्याने आणि पुतळ्यांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबवली जाईल. * १४ एप्रिल: प्रत्येक विधानसभा मतदारसंघात विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. स्थानिक लोकप्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होऊन सरकारच्या या नव्या योजनेची माहिती जनतेपर्यंत पोहोचवतील."महापुरुषांचा सन्मान करणे हे सामाजिक समरसतेचे प्रतीक आहे," असे मत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी व्यक्त केले आहे. विरोधकांच्या 'पीडीए' (पिछडा, दलित, अल्पसंख्याक) राजकारणाला उत्तर देण्यासाठी आणि दलित समाजापर्यंत पोहचण्यासाठी भाजप सरकारचा हा एक मोठा धोरणात्मक निर्णय मानला जात आहे. या योजनेमुळे उत्तर प्रदेशातील ग्रामीण आणि शहरी भागातील आंबेडकर स्मारकांना आता एक नवे आणि सन्मानजनक रूप मिळणार आहे, ज्यामुळे अनुयायांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.